MAHARASHTRA EDUCATION SOCIETY'S
(SINCE 1860)

# ABASAHEB GARWARE COLLEGE (Autonomous)

Karve Road, Deccan Gymkhana, Pune - 411 004. Maharashtra, India Ph: 020-41038200
E-mail : abasahebgarwarecollege@gmail.com Website www.garwarecollege.mespune.in

Prof.(Dr.) Vilas Ramchandra Ugale
MA Ph.D.
Principal

. NAAC Re-Accredited 'A' Grade
. Best College Award - Savitribai Phule Pune University
. Best Student Development Board Award - Savitribai Phule Pune University

. I.D.No. PU/PN/A.S/009(1945)
. JR.COLLEGE CODE : 11.11.003
. AISHE CODE : C-41477
. PUN CODE : CAAP 010040

संदर्भ क्र.: दि. ०७/०३/२०२५

## राष्ट्रीय सेवा योजना (२०२४-२०२५)
## शिबीर उपक्रम - (वरिष्ठ विभाग)

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत मएसोच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालय (स्वायत्त) मधील एकूण ३०० विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सहभागी होण्याची संधी मिळाली. या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशनानुसार आपल्या महाविद्यालयातील रासेयो विभागाने पुढील उपक्रम घेतले. या शैक्षणिक वर्षात सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी वृक्षारोपण, जनजागृती मोहीम, रक्तदान, श्रमसंस्कार शिबिरे तसेच कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण अशा अनेक उपक्रमात योगदान दिले.

या वर्षी दिनांक १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२४ रासेयोचे विशेष श्रमसंस्कार शिबीर या दरम्यान मु. दौंडकरवाडी, ता. खेड, पुणे येथे आयोजित केले होते. या शिबिरामध्ये महाविद्यालयाचे रासेयोचे १५० स्वयंसेवक सहभागी झाले. शिबिराचे उद्घाटन म.ए.सो. चे अध्यक्ष श्री. बाबासाहेब शिंदे यांनी केले. शिबिराच्या पहिल्या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. विलास उगले सरांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या अनुभवाने प्रेरित केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे सहा संघ निर्माण केले त्या संघांना कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ व स्वराज्य असे नावे देण्यात आली. प्रत्येक संघाने निवडून दिल्याप्रमाणे जेवणाची त्याचबरोबर व्यवस्थापनाची त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रमांची धुरा सांभाळली.

रा.से.यो. हिवाळी शिबिरातील दिनचर्या ही सकाळच्या विद्यापीठ आणि रा.से.यो. गीताने होत होती. त्यानंतर विद्यार्थ्यांकडून योगासने व व्यायाम करून घेतला जात. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास भावा यासाठी शिबिरातील प्रत्येक दिवशी एका खास प्रवक्तांना बोलवण्यात येत. यामध्ये पहिल्या दिवशी आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील डॉ. प्रदीप कुमार माने सरांनी विद्यार्थ्यांना वैचारिक साक्षरता या विषयावर मार्गदर्शन केले, दुसऱ्या दिवशी डॉ. शोभा करेकर मॅडम यांनी विकसनशील भारतात युवकांची भुमिका, तिसऱ्या दिवशी श्री सुधीर जी गाडे सरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : मार्गदर्शक जीवन, चौथ्या दिवशी डॉ. पांडुरंग कंद सर यांनी युवक आणि मूल्यशिक्षण, पाचव्या दिवशी श्री सोमनाथ धोंडे सरांनी रा. से. यो. समजून घेताना या विषयावर मार्गदर्शन केले.

या हिवाळी शिबिरा अंतर्गत विद्यार्थ्यांनी गावामध्ये गावची स्वच्छता, गावात झाडे लावणे, बंधारा बंधने व दुरूस्ती करणे, वनक्षेत्र संवर्धन इत्यादी प्रकारचे विविध लोकोपयोगी कामे केली. गावच्या सरपंच यांनी सुद्धा या कामाचे कौतुक केले. सांस्कृतिक विभागामध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या नाटकाद्वारे वृक्ष संवर्धन मतदानाची आवश्यकता या विविध विषयाची जाणीव करून दिली. २१ डिसेंबरला शिबिराला समाप्ती देण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शिबीर पार पाडण्यासाठी मा. प्राचार्य, सर्व उपप्राचार्य, तसेच शिक्षक आणि शिक्षेतर कर्मचारी यांचे सहकार्य वेळोवेळी मिळत राहिले.

रासेयो कार्यक्रम अधिकारी

**कार्यक्रम अधिकारी**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**आबासाहेब गरवारे महाविदयालय (स्वायत्त)**
**कर्वे रोड, पुणे-४.**

प्राचार्य 11.3.25

**प्राचार्य**
**म.ए.सो.चे आबासाहेब गरवारे महाविद्यालय**
**कर्वे रोड, पुणे-४.**